**राज्यातील महानगरपालिका/नगरपालिका/नगर परिषद शाळातील प्राथमिक शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजूरीचे अधिकारामध्ये सुधारणा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः वैखप्र १६१६/(२१६/१६)/टीएनटी-५**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: १५ जुलै, २०१६

वाचा :-

१. शासन निर्णय क्रमांकः शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. पीआरई ७०७२/८३९ दिनांक ४ जून,१९७३
२. शासन निर्णय क्रमांकः शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एमएसबी २००७(४७७/०७)/प्राशि-२ दिनांक २० फेब्रुवारी, २००९.
३. शासन परिपत्रक क्रमांकः शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,क्र. संकीर्ण २४१५/(३९/१५)/अर्थसंकल्प, दिनांक २८ ऑक्टोबर, २०१५
४. शासन निर्णय क्रमांकः सार्वजनिक आरोग्य विभाग वैखप्र २०१६/प्र.क्र.१६/२१०६/राकावि-२ दिनांक १६ मार्च , २०१६
५. शासन निर्णय क्रमांक: शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.वैखप्र २०१५/(५२२/१५)/ टीएनटी-५ दिनांक २९/०४/२०१६.
६. शिक्षण संचालक (प्राथ.) पुणे यांचे क्र.प्राशिसं/संकीर्ण पत्रे/२०१५-१६/५१६,७२१८,७१५२,२९७२ दिनांक २७ मे, २०१६ चे पत्र.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिका/नगरपालिका/नगर परिषदांच्या शिक्षण मंडळाच्या अखात्यारितील प्राथमिक शाळामधील सेवेत असलेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ मधील तरतूदींच्या अधीन राहून आकस्मिक उदभवणा-या २७ आजारांवर रुग्णालयात घेतलेल्या उपचारांवरील तसेच ५ गंभीर आजारावर शासनाने संपूर्ण खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारावरील वैद्यकीय खर्चाच्या प्रत्येक प्रकरणी रुपये १,००,०००/- (रुपये एक लाख) च्या मर्यादेत प्रतिपूर्तीस मंजूरी देण्याचे अधिकार कार्यालय प्रमुखाना आहेत. या मर्यादेवरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची प्रकरणे संबंधीत प्रशासकीय विभागाकडे सादर केली जातात. सद्य:स्थितीत औषधाच्या किंमतीत व उपचार पध्दतीवरील खर्चामध्ये झालेली वाढ तसेच अशी प्रकरणे निकाली काढण्यास लागणारा कालावधी इत्यादीचा विचार करता प्रचलित कमाल मर्यादेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक १६ मार्च, २०१६ अन्वये या मर्यादामध्ये केलेले बदल विचारात घेऊन शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.एमएसबी २००७/(४७७/०७) प्राशि-२ दिनांक २० फेब्रुवारी, २००९ मध्ये प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजूरीचे अधिकारांबाबत खालील प्रमाणे सुधारणा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

संदर्भ क्रमांक २ येथील दिनांक २० फेब्रुवारी, २००९ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करुन वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजूरीचे अधिकारांबाबत खालील प्रमाणे सुधारणा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

१. महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतूदीच्या अधीन राहून राज्यातील महानगरपालिका/नगरपालिका/नगर परिषदांच्या शिक्षण मंडळाच्या अखत्यारितील प्राथमिक शाळामधील सेवेत असलेले शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजूरीचे अधिकारामध्ये सुधारणा करण्यात येत असून रुपये २,००,०००/-(अक्षरी रुपये दोन लाख फ़क्त) पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस मंजूरीचे अधिकार संबंधित विभागाच्या कार्यालय प्रमुख म्हणजेच शिक्षण मडळ असलेल्या क्षेत्रामध्ये संबंधित महानगरपालिका/नगरपालिका/नगर परिषद चे प्रशासन अधिकारी यांना प्रदान करण्यास शासन मान्यता देत आहे. तसेच रुपये २,००,०००/-(अक्षरी रुपये दोन लाख फ़क्त) पेक्षा जास्त व रुपये ३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख फ़क्त) पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस मंजूरीचे अधिकार संबंधित विभागाच्या विभाग प्रमुखांना म्हणजेच संबधीत विभागीय शिक्षण उपसंचालक यांना प्रदान करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. रुपये ३,००,०००/-(अक्षरी रुपये तीन लाख फ़क्त) पेक्षा जास्त वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रकरणांना महाराष्ट्र राज्य (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील तरतूदींच्या अधिन मंजूरी देण्याचे अथवा उचित निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग म्हणजेच या विभागास राहतील.

३. वर नमूद केल्याप्रमाणे प्रशासन अधिकारी व विभागीय शिक्षण उपसंचालक स्तरावर वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रकरणांना मंजूरी देताना महाराष्ट्र राज्य (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींची काटेकोरपणे तपासणी करुन मंजूरी देण्यात यावी.

४. महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका खंड १ आणि महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ मधील तरतुदींनुसार शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. संकीर्ण २४१५/(३९/१५)/अर्थसंकल्प, दिनांक २८ ऑक्टोबर, २०१५ अन्वये नियंत्रक अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यात आलेले आहेत.

५. हा शासन निर्णय या निर्णयाच्या दिनांकाला प्रलंबित प्रकरणांना ही लागू राहील.

६. हे आदेश संदर्भाधिन क्र. ४ येथील सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक वैखप्र २०१६/प्र.क्र.१६/२०१६/राकावि-२, दिनांक १६ मार्च, २०१६ नुसार वाढविण्यात आलेल्या मर्यादेनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०७१५१६५४२७९४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2016.07.18 17:28:01 +05'30'

**( राजेंद्र पवार )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

२. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, (सर्व मंत्रालयीन विभाग) मंत्रालय,मुंबई.
३. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई (दोन प्रती)
४. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव / सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई
५. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
७. मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०. वित्त विभाग (कार्यासन सेवा-५) मंत्रालय, मुंबई
११. शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२.शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
१४. संचालक, महाराष्ट्र राज्य, पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,पुणे
१५. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
१६. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) जिल्हा परिषद
१७. सर्व शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
१८. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१९. सह संचालक,अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
२०. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
२१. जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
२२. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व)
२३. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
२४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२५. निवडनस्ती (कार्यासन टीएनटी-५).